महाराष्ट्र शासन
महसुल व वन विभाग
प्रधान मुख्य वनसंरक्षक(वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे कार्यालय.
O/o Principal Chief Conservator of Forests (HoFF), Maharashtra State
प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य
Principal Chief Conservator of Forests (Wildlife), Maharashtra State
"Van Bhavan"3rd Floor, Ramgiri Road, Civil Lines, Nagpur 440 001

Phone - 0712-2549563
E-mail - pccfwlngp@mahaforest.gov.in
Website - www.mahaforest.gov.in

**पत्र-ईमेल** क्रमांक:-कक्ष-२३(२)/वजी/सर्व्हे/प्र.क्र.२९२/५२३६/२०२३-२४, दिनांक:- १४/०२/२०२४

प्रति,

अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव),
पुर्व नागपूर.

विषय:- दुर्गापूर ओपन कास्ट माईन प्रकल्पासाठी आवश्यक चंद्रपूर जिल्हयातील ८०.७७ हे. वनजमीनी वरील खाणपट्टा नुतनीकरणाचा प्रस्ताव.

संदर्भ:- अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) पुर्व नागपूर यांनी या कार्यालयास उद्देशुन लिहलेले त्यांचे कडील पत्र क्र. १०३९ दि. १६/०१/२०२४

दुर्गापूर ओपन कास्ट माईन प्रकल्पासाठी आवश्यक चंद्रपूर जिल्हयातील ८०.७७ हे. वनजमीनी वरील खाणपट्टा नुतनीकरणाचा प्रस्ताव संदर्भीय पत्रान्वये या कार्यालयास प्राप्त झाला. सदर प्रस्तावाचे तांत्रिक संस्करण केले असता खालील बाबी निदर्शनास येत आहे.

१. चंद्रपूर वनविभागातील वनखंड क्रमांक ४००, ४०१ , ४०२ व २६२/१ मधील १२१.५८ हेक्टर वनक्षेत्राला राष्टीय वन्यजीव मंडळाच्या स्थायी समितीची ७२ वी बैठक दिनांक २४/०४/२०२४ रोजी मान्यता प्रदान केलेली होती.

२. त्या अनुषंगाने या कार्यालयाचे पत्र क्र. ४९७ दिनांक २२/०५/२०२३ अन्वये कामे सुरु करण्याची मान्यता प्रदान करण्यात आलेली होती.

३. प्रस्तावित ८०.७७ हे. वनजमीनीवरील खान पट्टा हा वर नमुद केलेल्या १२१.५८ हेक्टर पैकी नाही.

४. प्रस्तावित खान पट्टा नुतनिकरणाचे क्षेत्र (८०.७७ हे. ) ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पापासून दक्षिणेकडील चपराळा अभयारण्य ते छत्तीसगड राज्यातील इंद्रावतील व्याघ्र प्रकल्पाला जोडणारा व्याघ्र भ्रमणमार्गावरील क्षेत्र आहे.

५. प्रस्तावित कोळसा खाणीमुळे वन्यजीवांच्या अधिवासास तसेच भ्रमणमार्गास बाधा निर्माण होईल.

६. प्रस्तावित ८०.७७ हे. दुर्गापूर ओपनकास्ट माईनचे प्रस्तावास मंजूरी देणेबाबत प्रस्तव राज्य वन्यजीव मंडळाच्या स्थायी समिती समोर तसेच, राट्रीय वन्यजीव मंडळाची मान्यता घेणे आवश्यक आहेत.

७. सदर प्रस्तावास मंजूरी देणे क्रमप्राप्त झाल्यास दुर्गापूर येथिल प्रस्तावित कोळसा खाणीकरीता मागणी करण्यात येत असलेल्या वनर्क्षेत्रात ओपनकास्ट ऐवजी भुमिगत कोळसा खाण प्रस्तावित केल्यास वन तसेच वन्यजीव यांच्या अस्तित्वाला बाधा निर्माण होणार नाही. व वन्यप्राण्याचे भ्रमणमार्ग सुध्दा अबाधित राहील.

८. दुर्गापूर ओपनकास्ट माईनसाठी प्रस्तावित असलेले क्षेत्राला लागून प्रस्तावीत व्याघ्र सफारीचे क्षेत्र आहे.

९. याद्दष्टीने प्रस्तावित माईनचे क्षेत्र तसेच व्याघ्र सफारीचे क्षेत्र यादरम्यान ३ मीटर उंची असलेली ७००० मीटर लांब संरक्षण भिंत किंवा इतर आवश्यक Barrior वन्यजीव विभागाचे असल्याने संबधित खाण व्यवस्थापनाकडून बांधून देण्यात यावी. अशी शिफारस क्षेत्रीय स्तरावरुन करण्यात आलेली आहे.

वरिल सर्व घटनाक्रम लक्षात घेता दुर्गापूर ओपनकास्ट माईनसाठी प्रस्तावित खान पट्टा नुतनिकरणाचे क्षेत्र (८०.७७ हे. ) हे व्याघ्र भ्रमणमार्गात येत असल्यामुळे प्रकल्प यंत्रणेने वन्यजीव मान्यतेचा प्रस्ताव सादर करुन त्यास राष्ट्रीय वन्यजीव मंडळाची मान्यता प्राप्त करुन घेणे आवश्यक आहे, असे ईकडील मत आहे.

(महिप गुप्ता)
प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव),
महाराष्ट्र राज्य

प्रतिलीपी - प्रधान सचिव (वने), महसुल व वनविभाग, मंत्रालय, मुंबई यांना माहितीस सादर.
प्रतिलीपी - अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा केंन्द्रस्थ अधिकारी महाराष्ट्र राज्य यांना माहितीस अग्रेषीत.
प्रतिलीपी - वनसंरक्षक तथा क्षेत्र संचालक, ताडोबा व्याघ्र प्रकल्प, चंद्रपुर याना माहितीस अग्रेषीत .
प्रतिलीपी - मुख्य वनसंरक्षक, चंद्रपुर वनवृत्त, चंद्रपुर यांना माहितीस अग्रेषीत.
प्रतिलीपी - विभागीय वन अधिकारी, चंद्रपुर वनविभाग चंद्रपुर यांना माहितीस अग्रेषीत.